म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. १८९६

# आणि ती सूर्यफूल झाली

BVBK-0401896
BVBK-0401896

# आणि ती सूर्यफूल झाली

म. पं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
वा. क्र. ९८९६ दिनांक १२.१.९६
विषय बा.वा क्र. ........

सौ. मुमताज रहिमतपुरे

BVBK-0401896

प्रचार प्रकाशन, कोल्हापूर-४१६००८

# आणि ती सूर्यफूल झाली Ani Ti Suryaful Zali

सौ. मुमताज रहिमतपुरे Sou. Mumataj Rahimatpure

प्रकाशन क्रमांक २५ प्रथम आवृत्ती १९८४

प्रकाशक /
**सौ. नंदिनी तु. गवळी**
प्रचार प्रकाशन
५१३ ब, प्लॉट नं. ४ अ, नलवडेमाळ,
प्रतिभानगर पिछाडीस, सागरमाळ.
कोल्हापूर–४१६००८

मुद्रक /
**श्रीपाद सिताराम गोसावी**
राजहंस प्रिंटींग प्रेस
नागाळा पार्क, कोल्हापूर–४१६००३
फोन : २३९०६

मूल्य / ३ रु. फक्त

© फारुख कासिम रहिमतपुरे

मुखपृष्ठ / स्टुडिओ मयूर / मधुकर ओतारी

ब्लॉक / उदय प्रोसेस

– प्रमुख वितरक –
मे. सिद्धार्थ बुक सेंटर, गाळा नं. २० प्रतिभानगर मार्केट,
सागरमाळ, कोल्हापूर–४१६००८

वा. क्र. ९८९६ दिनांक १२.१.६६
विषय श्री. वा

# आणि ती सूर्यफूल झाली

---

समुद्राच्या तळाशी अेक सुंदर नगरी होती. त्या नगरीतील घरे सोन्या-चांदीची होती. तर दारे मोत्यांची होती. छोटे--छोटे सुंदर मासे म्हणजे त्या नगरीतील मुलं. ती मजेत आपल्या राज्यात कधी शिपल्याशी खेळत, तर कधी मोती उधळीत; तर कधी समुद्रफुलं हुंगीत. अशा या सुंदर नगरीवर समुद्रराजा राज्य करीत होता. तो साऱ्याशी प्रेमाने वागे. साऱ्यांचे कौतुक करी, पण खवळला की, कोणाला ऐकत नसे. अशा या समुद्रराजास अेक अतिशय सुंदर कन्या होती. ती समुद्रकन्या म्हणूनच ओळखली जाई. ती प्रेमळ, आज्ञाधारक होती. पण वडिलांप्रमाणे लहरी व हट्टीही होती.

समुद्रकन्या होती खूप खेळकर. एकदा ती आपल्या पित्यास म्हणाली, " बाबा, बाबा मला व माझ्या सखींना खूप दूरवर जाऊन खेळण्याची परवानगी द्या. "

समुद्रराजाने प्रथम नकार दिला. पण शेवटी समुद्रकन्येने आपला हट्ट पुरा केला, तिला समुद्रराजाने तशी परवानगी दिली. ती मात्र एका अटीवर. तिच्या सख्यांनी व तिनं कुठंही

खेळायला जावं, पण सायंकाळच्या आत परत यायला हवं. नंतर उशिरा येणारीस समुद्र नगरीत परत कधीच घेतले जाणार नाही.

समुद्रकन्येनं अट मान्य केली. ती व तिच्या सख्या दूरवर खेळायला जायच्या. मात्र अटीप्रमाणे लवकर घरी परतायच्या.

अेकदा समुद्रकन्या लाटेशी खेळता-खेळता अगदी समुद्र फेसापर्यंत आली. ती तिथल्या समुद्रफेसावर मजेत बसली. अन् तिचं लक्ष एकदम अस्ताला जाणाऱ्या दैदिप्यमान सूर्याकडे गेले. जाता-जाता त्याने विविधरंगाच्या तयार केलेल्या रंगावलीने ती मोहून गेली. ती भान हरपून पहात राहिली. ती जेव्हां भानावर आली तेव्हा संध्याकाळ झाली होती. तिला आपली चूक उमगली. तिला माहीत होतं, बाबा आपणाला क्षमा करणार नाहीत. सर्वांच्या आठवणी काढत रडत रडत ती समुद्रफेसावरच झोपी गेली.

समुद्रराजाने जाणले, आपल्या मुलीने अट मोडली. पित्याचे हृदय कळवळले, द्रवले. पण तो पडला राजा. राजा नियम करणारा, मग नियमकर्त्यानेच नियम कसे मोडावयाचे ? समुद्रकन्येस शिक्षा झालीच पाहिजे. आता तिला समुद्रनगरीत घेतले जाणार नाही. तो गप्प बसला.

पाखरांच्या किलबिलाटाने समुद्रकन्या जागी झाली. डोळे चोळत तिने आपले लांबसडक केस झटकले. केसातून माळलेले मोती ओघळले, टप्‌टप्. तिचे लक्ष उगवणाऱ्या सूर्याकडे गेले. ती सूर्याच्या तेजाने मोहून गेली. तिला सूर्य फार आवडला. अेवढी प्रकाशमान व्यक्ती तिने अजून समुद्र राज्यात पाहिली नव्हती.

सारा दिवस ती तहानभूक विसरून, समुद्रफेसावर बसून

सूर्याकडे पहात राहिली. सूर्याचा रथ आकाशाचे अंतर जसजसे तोडीत जाई, तसतशी ती सूर्याच्या दिशेने मान फिरवीत राही. सूर्याने धरतीचा निरोप घेतला. निराशेने ती झोपी गेली. तिला अजून त्या व्यक्तीचे नाव माहीत नव्हते, की रहस्य कळले नव्हते.

सकाळी परत ती पक्षांच्या किलबिलाटाने जागी झाली. कुतुहलाने तिने अेका पक्षास उगवणाऱ्या प्रकाशाकडे बोट दाखवून नाव विचारले. त्याने चिवचिवत नाव सांगितले – ‘ सूर्य. ’

समुद्रकन्या खूश झाली. तिला आपल्या आवडत्या व्यक्तीचे नाव कळले होते. ती ‘ सूर्य, ’ ‘ सूर्य. ’ नावाचा जप करीत सूर्याकडे तो मावळेपर्यंत पहात राहिली. वेडी पोरगी !

थकून भागून विश्रांतीसाठी जाताना सूर्याचे लक्ष अचानक समुद्रकन्येकडे गेले. तो मनाशी म्हणाला, ‘ का बरं ही वेडी पोर माझ्याकडे मी जाईन तिकडे पहात राहते ? तहानभूकेची देखील तिला शुद्ध नाही. उद्या आपण विचारायचचं याचं कारण. ’ असं म्हणून सूर्य निघून गेला.

समुद्रकन्या सूर्य गेलेल्या दिशेकडे पहात होती. तो गेल्यावर ती उदास झाली. कोमेजून तशीच पडून राहिली. उगवतीची वाट पहात.

दुसऱ्या दिवशी सूर्य हसत आला. समुद्रकन्या त्याची वाट पहातच होती. तो हळूच तिच्याकडे येत आपल्या किरणानी गोंजारत हसत म्हणाला, “ ये छोटया छोटया गोड पोरी, अशी वेडयासारखी माझ्याकडे पाहतेस काय ? ”

समुद्रकन्या लाजली, ओशाळली. काय बोलावं ते तिला

कळेचना. मग तिने आपली सारी हकीकत सूर्याला सांगितली. म्हणाली, ' सूर्यदेवा, मला तुझे वेड लागले आहे. तुझा प्रकाश मला आवडतो. तू गेलास की मला कोमजल्यासारखे होते.'

सूर्य हसत म्हणाला, ' एवढं माझं वेड लागलंय ? बोल, तुला काय पाहिजे ? '

समुद्रकन्या लाजत लाजत म्हणाली, ' दुसरं कांही नको सूर्यदेवा ! तू जाशील तिकडे मी हसत सारखं तुला पहावं असे वाटेत ! अगदी न थकता !

सूर्य परत गोड हसला. म्हणाला,' तथास्तु ! ' वेडी आहेस. आता तू पिवळया रंगाचं हसरं असं मोठं फूल होशील. तुला माझा पिवळा रंग आवडतो ना! म्हणून तुझा रंग पिवळा अन् तू, मी जाईन तिकडे तोंड करीत मला पहात राहशील ! आता यापुढे लोक तुला सूर्यफूल म्हणू लागतील.

सूर्य रथात बसला. समुद्रकन्या गेंडेदार मोठया पिवळया रंगाचं फूल झाली आणि हसत मावळत्या सूर्याला न्याहाळू लागली. आता ती सूर्यफूल होती. सूर्य तिचा हसत निरोप घेत होता.

□ □

दिनांक १२.१.८६
बा. वा.

# चिमुरड्या निघाल्या नंदनवनी

हळु हळु साऱ्या जमल्या. अेक-अेक करून जमल्या. साऱ्याच होत्या लहान, पण होत्या छान छान. इवल्या इवल्या पंखात त्यांचा मावत नव्हता आनंद.

कालच्या रात्री परीराज्यात होती धमाल. नाच, गाणी, खेळ यानी रंगली होती बहार, म्हणून मोठयांचं आळसावलं होतं अंग. मऊ मऊ पाकळ्याची गादी सोडायला नव्हत्या त्या तयार. पण या छोटया पऱ्या मात्र उठल्या नेहमीच्या वेळी. आपआपल्या आईला सतावू लागल्या वेळोवेळी. त्रासलेल्या आयांनी मग हाकलून लावलं त्यानां झणी. मग जमल्या साऱ्याजणी हिरव्या रानी.

आता काय करावे ? कुठं जावं ? काय खेळावं ? याचा खल झाला. पण प्रत्येकांची मात्र वेगळीच तऱ्हा. एकमत काही होईना. खेळ कांही रमेना.

इतक्यात आपले इवलेसे पंख सावरीत छोटी आली. सगळ्यानी पाहिला तिचा नाराज झालेला चेहरा. म्हणून एकमेकीस त्यांनी विचारलं डोळ्यानी काय झाल गं, छोटीला ? कारण कोणाला गवसेना.

छोटी साऱ्याची लाडकी. छोटी होती ना ती ! म्हणून तर अशा या छोटीचे होते गुलाबी गुलाबी गाल. तिच्या चांदणी डोळ्यात लपून असे हासू आणि आसू. चाफेकळीच्या नाकी होता ठसकेबाज राग. भुऱ्या भुऱ्या रेशीमकेसी रिबन ऐटबाज. इवल्या पांढऱ्या पंखाचा झोक काही न्याराच. गोऱ्या गोऱ्या छोटीला गुलाबी फ्रॉक.

अशा या छोटीला काय झाले ? कोण रागावलं ? या लहानातील परी पुढे सरसावली. छोटीचा हात धरुन विचारू लागली. छोटे ! छोटे ! तुझं तोंड इवलंस का ?

छोटीला हुंदका फुटला. कावऱ्याबावऱ्या झाल्या त्या साऱ्याजणी. छोटीचं रडणं लागलं त्यांच्या मनी.

लहानातील मोठी परी होती शहाणी. ती छोटीचे डोळे पुसत हळूच म्हणाली – ' आईनं बाहेर काढलं ना तुला ? दंगा करतेस म्हणून ! अगं मग त्यात काय झालं ? आम्हाला पण आमच्या आयांनी हाकलून लावलंय. खुशाल झोपूदे त्यानां ! मोठी मंडळी अशीच आळशी ? आपण मस्तपैकी खेळू-नाचू काय ?

तिनं साऱ्याना खुणावलं. झटकन फेर धरला. छोटी भोवती नाचू लागल्या. गाऊ लागल्या. छोटीचा रडवा चेहरा हळूहळू हसू लागला. गाऊ लागला. मग लपाछपीचा खेळ झाला. साऱ्या दमून भागून बसल्या.

छोटी एकदम म्हणाली, – ' आज मुळी घरी लवकर परतायचं नाही. बसू दे एकटीच आईटलीला ! '

साऱ्यांना हे पटलं. घरातून हाकलून लावलंय ना ? मग


येऊच दे त्याना शोधत शोधत. आज मुळी घरी आईनं स्वत: बोलवायला आल्याशिवाय जायचंच नाही. चांगलं लपून बसायचं. ठरलं तर मग !

पण लपायचं तरी कुठं ? अगदी जवळ इथंच कुठं ? नको बाई ! !

अेकीनं शक्कल काढली - ' नुसतं नको बाई लपून बसणं, त्यापेक्षा आपण कुठं तरी जाऊया का ट्रीप म्हणून. ' ही आयडिया पसंत पडली.

पण ट्रीपला कुठं बरे जावे ? लहानातील मोठी परी पुढे सरसावली. म्हणाली, – ' मी पाहिलंय नंदनवन. त्याचा रस्ताही माहीत आहे मला. जायचं का आपण तिथे ? मजा मारायला ? '

लहानातल्या ज्या छोटीसारख्या लहानग्या पऱ्या होत्या त्यानी नव्हतं पाहिलं नंदनवन. अजून लहान होत्या ना त्या ? म्हणून त्यांच्या आयांनी अजून त्यांना दाखवलं नव्हतं नंदनवन.



चिमुरड्यांना उत्सुकता होती नंदनवन पाहण्याची. त्यानी बरीच काही ऐकली होती या स्वर्गातल्या नंदनवनाची कहाणी.

नंदनवनास जाताना म्हणे ओलांडावा लागतो इंद्रधनूचा पूल. नंदनवनात आहेत म्हणे उंच उंच झाडे. तर आहेत म्हणे तिथं न कोमेजणारी सुंदर सुवासिक फुलं. आणि म्हणे सोन्याच्या डोंगरातून वाहते अमृतनदी. शिवाय नंदनवनातील फळे म्हणे मोठी रसाळदार. देखणेदेखणे पक्षी गाती गोडशार. अशा या नंदनवनाची ट्रिप होईल शानदार.

साऱ्यांनी पंख पसरून झेप घेतली आकाशी. तरंगत तरंगत निघाल्या त्या नंदनवनी.

चिमुरड्यांना पाहून वारा हसला मंदमंद. झळाळणारा सूर्य झाला एकदम मऊ मऊ. चिमुरड्या निघाल्या गात गात त्या नंदनवनी.

पांढरे रंग तरंगत होते आपुल्याच मस्तीत, ढगाना पाहून चिमुरड्यांना आली एक हुक्की, त्या म्हणाल्या, ' ढगाशी खेळू लुटुपुटुची लढाई. '

ढग होते बेसावध. डोळे मिटून चालले होते आकाशाची वाट. हसत हसत चिमुरड्यानी केला ढगांवर वार. ढगांची झोप उडाली. डोळे उघडून पाहिलं तर चिमुरड्या होत्या फार. ढग झाले लाल लाल.

छोट्यातल्या मोठीनं खुणावलं सख्याना. इशाऱ्यासरशी ढगाच्या पोटावर सुरू झाला गुदगुल्याचा मारा. हसता–हसता ढग लाल–काळे झाले. जोरजोरानी गडगडू लागले. आता मात्र चिमुरड्यांची उडाली घाबरगुंडी. इकडे पळू की तिकडे पळू. कांहीच सुचेनासं झालं. ढगाच्या आधी त्यांनाच रडू आलं !

झटकन् त्यानी मोहरा वळवला. घराच्या दिशेने झेपावल्या साऱ्याजणी. आणि आईच्या कुशीत लपल्या झणी.

□ □

# गुलाबाला आले काटे

ही गोष्ट आहे गुलाबाची. खूप दिवस झाले त्याला. तो गर्वाने टम्म फुगला होता. त्या गर्वालाही एक कारण होतं. तो दिसायला खूप देखणा होता. त्याचा सुवास फार छान असायचा. शिवाय तो एकदा फुलला की कधी कोणत्याही कारणानं कोमेजायचा नाही. सदा हसतमुख, तजेलदार, टवटवीत असायचा तो. सदा टवटवीत रहाण्याचं वरदान दिलं होतं त्याला. देवानं आणि म्हणूनच तो गर्विष्ठ झाला होता. इतर फुलांच्याकडे तो तुच्छतेने पहायचा. त्याना चिडवायचा. पहा माझा सुंदर रंग, पहा माझा दरवळणारा सुवास. अन् पहा माझा सदाचा टवटवीतपणा !

असं वरदान कोठल्या फुलाला मिळालंय का ? इतर फुलं बिचारी खाली मान घालून त्याचं चिडवणं ऐकायची. त्यांनाही रंग होते, त्यानाही सुवास मिळाला होता. पण गुलाबाची ऐट काही न्यारीच आहे हे त्यांनाही पटत होतं. तरी त्यांना गुलाबाचा हा गर्विष्ठपणा कांही आवडला नाही.

देवांचा पुजारी फुलांची परडी घेऊन बागेत फुलं न्यायला आला की ते भक्तीभावाने त्याच्या परडीत जाऊन पडत. पण

गुलाब आपल्याच नादात असायचा. तो पुजारी आला काय किंवा गेला काय इकडं लक्ष द्यायचा नाही.

अेक दिवस पुजारी नेहमीप्रमाणे परडी घेऊन बागेत आला. आज देवाचा उत्सव होता म्हणून देवाला फुलानं चांगलं सजवायचं होतं त्याला. त्याचं लक्ष गुलाबाकडे गेलं. त्यानं ठरवलं चला आज आपण गुलाबानं देवास सजवू. तो गुलाबास म्हणाला, ' हे गुलाबा, आज तू नशिबवान दिसतोस, तुझ्यासारख्या सुंदर फुलानं देव सजला तर देवास आगळंच सौंदर्य प्राप्त होईल. चल ये परडीत. म्हणून गुलाबास तोडण्यासाठी त्याने हात उचलला.

गुलाब आपल्याच नादात होता. ते रागाने म्हणाले, ' हे बघ पुजारी—मी आहे इथंच ठीक आहे. देवाची पूजा करण्यासाठी माझा देह नाही झिजवायचा मला, जा तू ! ' पुजारी म्हणाला, ' अरे, देवाच्या वरदानानेच तुला हे सदाचं ताजेपण लाभलं आहे. याचा थोडा तरी विचार कर ! ' तर गुलाब गुर्मीतच राहिला. पुजारी मनात म्हणाला, ' असल्या उद्धट, उपकाराची जाणीव नसलेल्या गुलाबानं देवाची पूजा करण्यापेक्षा बाकीची नम्र फुलं बरी. तो नेहमीप्रमाणेच रोजची फुलं घेऊन देवाची पूजा करण्यासाठी गेला.

देवानं सारा प्रकार जाणला होता. त्याला गर्विष्ठ गुलाबाचा फार राग आला होता. त्याला शिक्षा देण्याचं त्यानं ठरविलं.

अेकदम चमत्कार झाला. गुलाबात आपणास कांहीतरी बदल होऊ लागलाय याची जाणीव होऊ लागली. त्यानं वाकून पाहीलं तर, त्याचं सारं अंग काटयानी भरुन गेलं होतं. त्यानं स्वत:कडे पाहिलं तर, इतर फुलासारखंच त्याचंही तोंड कोमेजून

गेलं होत. आणि त्याच्या अेक अेक पाकळ्या खाली पडू लागल्या होत्या.

त्याला हे काय होतंय ते कळेनाच. मग हळू हळू त्याला सारं आठवलं. हे आपल्या गर्वाचे फळ आहे. आपण फार सुंदर आहोत, सदा टवटवीत असतो म्हणून आपणास गर्व चढला, देवानं आपणास हे देणं दिलंय हेच आपण विसरून गेलो. आपण देवाच्या पूजेस गेलो नाही. देव सर्वसाक्षी आहे. तो सारं जाणतो म्हणूनच त्यानं मला ही शिक्षा केलेली दिसते.

त्याला आपण गर्वाने वागलो, इतराशी दुष्टावा केला म्हणून पश्चाताप होऊ लागला. सदा हसणारा तो मनापासून रडू लागला. त्याला खरा पश्चाताप झाला होता.

देवाला गुलाबाची दया आली. तो गुलाबाच्या कानात पुटपुटला – पाहिलंस गर्वाचं घर कसं खाली होतं ते. कोणीही कधीही गर्व करू नये. गर्व केल्यानं आपलाच नाश होतो. असूदे तुझ्या अंगात काटे असले तरी सदा टवटवीत नाही राहणार तू आता, पण तू असा मुळीच रडू नकोस. दु:खातसुद्धा कसं हसायचं असतं हे तू साऱ्यांना दाखवून दे. अजूनही सारे पुष्पराज गुलाब म्हणतील असं माझं तुला वरदान आहे. चल डोळे पूस पाहू ! '

गुलाब खुदकन हसला. गुलाबाचं हसू पाहिलं की आपणालाही प्रसन्न व्हायला होतं नाही कां !

□ □

म. सं. ठाणें, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ७६८८ दिनांक १२.१.८६
विषय बा. वा क्र.........

# परीराणी सुगंध वाटी


फारफार वर्षापूर्वीची गोष्ट आहे. त्या काळीदेखील सूर्य आपल्या कोमल किरणांनी सकाळी पृथ्वीला न्हाऊ घालायचा, चंद्र, आपल्या तारकांनी जडविलेल्या काळ्या दुलईचं तिला पांघरुण घालायचा. पृथ्वी फार खुशीत असायची. आपल्या अंगा खांद्यावर ती अवघ्या वनश्रीला खेळवायची.

अशा या पृथ्वीवर खूप सुंदर बागबगिचे होते. बगिच्यातली झाडं, झुडपं, वेली वाऱ्यासंगे मजेत डोलायची तर फुलं खुदुखुदु आनंदात हसायची. फुलंच ती– सारखी तोंड भरून हसायची.

त्याकाळी फुलांना आता असतो तसा छानसा सुगंध नव्हता. पण वेगवेगळ्या मोहक रंगाची मात्र होती ती. सारी बिनवासाची फुलं. अशा फुलांना एकदा परी राणीनं आपल्याजवळ असणारे सुगंध वाटले – त्याची आहे ही गोष्ट !

अेकदा एक छोटुली परी पंख पसरून हवेत मजेत तरंगत होती. तिला आपल्या कवेत वारा आनंदाने झेलत होता. तर कधी आपल्या झुळकीनं तिला दूर ढकलीत होता. वारा अन्

परी खेळण्यात रंगून गेली होती. पण परी तर होती छोटूली. ती खेळून अन् तरंगून दमून गेली होती. ती लुकलुकत्या डोळ्यानी इकडं–तिकडं पाहू लागली. बसायला जागा शोधू लागली. झाडांची पानं तिला आधी दिसली. तिला वाटलं, किती छान छान हिरवीगार पानं आहेत ही. नरम असतील. आपण त्यावर बसून थोडा आराम करावा. म्हणून ती तरंगतच एका पानावर येऊन बसली. त्यावर ती बसते न बसते तो तिला कांही खुपायला लागलं. काट्यासारखं टोचू लागलं. कावरीबावरी होऊन ती पंख पसरून उभी राहिली. इकडे-तिकडे काय आहे का शोधू लागली. मग तिच्या इवल्या डोक्यात प्रकाश पडला की, अरे आपल्याला टोचतं आहे त्या तर पानाच्या शिरा आहेत !



परत परीला प्रश्न पडला, आता कोठे बरं क्षणभर विसावा घ्यावा. चोहोबाजूस पहात असताना तिला नरम गालिच्यासारखं

दिसणारं हिरवं गवत दिसलं. ती आनंदली, गवतावर बसायला धावली. गवतावर बसते न बसते तोच टुण्कन उडी मारून तिने आकाशात उडण्यासाठी पंख पसरले. तिला अंगात सुया टोचल्याचा भास झाला. इतकी त्या सुंदर दिसणाऱ्या गवताची टोकं तीक्ष्ण होती. ती रडवेली झाली. कोठे आसरा घ्यावा हे तिला सुचेना. ती फार फार दमली होती.

कशीबशी स्वतःला सावरीत ती एका फुलाजवळ येऊन थांबली. ते फूल तिच्याकडे पाहून आनंदानं हसत होते. ते परीला म्हणाले, ' छोटी परी, फार दमल्येस गं. इकडे ये, माझ्याकडे बघ, तुला झोप आली, हो ना ? ये. माझ्याजवळ ये. माझ्या खांद्यावर शांतपणे झोप. अगदी मजेत.

परीचे डोळे मिटायला लागले होते. तिने विचार केला नाही. आपलं छोटं शरीर तिनं फुलाच्या अंगावर झोकून दिलं. फुलांनं तिला अलगद झेललं, आपल्या कुशीत घेतलं ते डोलू लागलं, अंगाई गुणगुणू लागलं परी आपल्या आईच्या कुशीत झोपल्यासारखी मजेत झोपली होती. स्वप्नात हसत होती. छोटूलीची आई पऱ्याची राणी होती. छोटूली अजून परतली नव्हती, म्हणून ती काळजी करू लागली. नेहमीप्रमाणे वाऱ्याशी खेळून छोटुली अजून परतली नव्हती. तिन्हीसांजा झाल्या तरी ती परतली नाही. आता मात्र छोटुलीच्या आईला रडू यायला लागलं. ती धावतच निघाली छोटुलीला शोधायला. छोटुलीला कोणीच पाहिलं नव्हतं. मग तिनं रडत रडत वाऱ्याला विचारलं– ' वारे दादा, वारे दादा, अरे माझी छोटुली कुठं आहे ?

वारा आपल्याच मस्तीत होता. पटकन् पळत पळत ओरडला– ' मला काय माहीत ! '

छोटुलीच्या आईला वाऱ्याचा राग आला,पण करते काय ? तिला वाऱ्याशी भांडत बसायला वेळच नव्हता मुळी. तिला तिची छोटुली शोधायची होती ना ?

इकडे तिकडे बारीक नजरेने ती पहात होती. कोठे छोटुली दिसते का म्हणून. तोवर तिच्या हाताखाली असणाऱ्या अनेक पऱ्या छोटुलीला शोधायल्या निघाला. मग त्यांनी ठरविलं की, आपण सर्वांनी मिळून छोटुलीला हाका मारायच्या. म्हणजे जवळपास कोठे छोटुली असली तर तिला आपला आवाज ऐकून धीर येईल. छोटुलीच्या आईच्या हृदयात धडधडत होते. वाईट विचार येत होते.

तिला वाटत होते. तिची लाडकी छोटुली कुठे रस्ता चुकली नसेल ? नाही तर तिच्यावर काहीतरी भयंकर संकट आलं असावं. छोटुली सुखरूप असेल ना ?

आपल्या सुंदर नाजूक आवाजात साऱ्या पऱ्या छोटुलीला हाका मारू लागल्या. छोटुली गाढ झोपली होती. तिला कशाचाच पत्ता नव्हता. तिला काही तिच्या नावाच्या हाका लवकर ऐकायला गेल्या नाहीत. ती आपली झोपेत छान स्वप्न पहाण्यात रंगून गेली होती.

इतक्यात तिला तिच्या आईसारखा असणारा आवाज ऐकू आला. तो आवाज रडवेला होता. ' छोटू, बाळ, छोटू, बाळ ' अशा हाकांनी ती जागी झाली. इकडे तिकडे पाहू लागली तर एका सुंदर नि मऊ जागेत आपण मजेत बसलो आहोत हे तिला समजलं. परत तोच आवाज तिच्या कानी आला. तिनं ओळखलं

आपली आई आपल्याला शोधत आल्येय. आपण लवकर सापडलो नाही म्हणून ती रडतही असावी. तिला आईची मज्जा झाली म्हणून खुसुखुसु हसूच यायला लागलं ! ती हळूच फुलातून डोकावत ओरडली– ' आई, मी इथ्ये ! '

गर्रकन मान वळवून तिची आई तिला पाहू लागली तर, एका फुलातून डोकावणारं छोटूलीचं डोकं तिला दिसलं. छोटुली खटचाळपणे हसत होती !

पंख पसरून पटकन उडत छोटुलीची आई छोटूजवळ धावली. आपल्याजवळ मायेनं तिला घेत ती उसन्या रागाने म्हणाली, ' अश्शी वाईट, आहेस बघ तू छोटुली ! किती खटचाळपणा करतेस वरं !

इतक्यात साऱ्या पऱ्या आनंदानं तिथे धावल्या. त्यांच्याभोवती फेर धरून गाऊ–नाचू लागल्या.

छोटुलीनं मग आईला सारं सांगितलं. ती म्हणाली – ' बघ तर या फुलात आत जाऊन कसं वाटतं ते. ' मग छोटूची आई हळूच फुलात शिरली. तिला आत मऊ मऊ नाजूक असणारी सुंदर जागा फार आवडली. तिला वाटलं आपणही छोटुलीसारखं आनंदानं इथंच झोपावं.

छोटुलीची आई मग त्या फुलाला म्हणाली – ' हे फुला, ही जागा फार मऊ, सुंदर आहे. मला या पऱ्यांच्या राणीला ही जागा फार आवडली. तू आम्हांला कधीमधी तुझ्याजवळ येऊन रहायला परवानगी देतोस का ?

फूल विनयानं म्हणालं, – ' परीराणी, जागा तुझीच आहे.

मनात येईल तेव्हा तू खुशाल माझ्याकडे आणि माझ्यासारख्या इतर फुलांकडे येऊन रहात जा.

परीराणी खूश झाली. तर छोटुली आनंदानं टाळचा पिटू लागली. परीराणीनं पुढं विचारलं, ' पण याबद्दल मी तुला काय बक्षीस देऊ बरं फुला ? '

फूल म्हणाले – ' छे, बक्षिसाची काय गरज ? तुझ्यासारख्या नाजूक राणीला माझ्यासारख्याकडे येऊन रहायला आवडतं. यातच मला सारं मिळालं ! '

परीराणी फुलाच्या नम्र स्वभावाने आनंदली. छोटुली विचारात पडली की ! काय बरं या फुलाला बक्षीस द्यावं. याला कांहीतरी बक्षीस द्यायचंच असं तिनं ठरविलं.

इतक्यात कसलासा सुगंध पसरलेला तिला जाणवला. तिने मान वळवून पाहिले तर एक मृग आपल्याच नादात चरत होता.

छोटुलीनं विचार केला, या मृगाजवळच तेवढा कस्तुरीचा सुगंध आहे. असला सुगंध फुलाला आपण दिला तर !

छोटुली आपल्या आईचा पदर ओढीत म्हणाली ' आई गं आपण या फुलाला त्या मृगाजवळ आहे तशा प्रकारचा छान छान वास दिला तर गं ? '

परीराणी छोटुलीच्या कल्पनेनं खूश झाली. पटकन तिचा पापा घेत ती म्हणाली, ' माझी शहाणी छोटुली तू !

ती फुलाला म्हणाली, ' हे फुला मी तुला सुगंधाचं वरदान देते ! '

ते फूल म्हणाले, ' परीराणी तू दयाळू आहेस. माझं एक मागणं आहे. माझ्याबरोबर माझ्यासारख्या इतरही फुलांना तू सुगंध दे. '

परीराणी आनंदून म्हणाली, ' मी सर्वांनाच वेगवेगळया प्रकारचे सुगंध वाटते, जे फक्त माझ्या राज्यात आहेत ! ' अन् तिनं सर्वांना सुगंध वाटला.

आणि तेव्हांपासून परीराणी आपल्या इतर पऱ्यांसह फुलात येऊन राहू लागली. अन् तेव्हापासूनच फुलात वेगवेगळे मन मोहवणारे सुगंध मिळाले !

म. सं. मं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
ना. क्र. १८९६ दिनांक १२.१.८६
विषय बा. वा. क्र. ........



" सूऽरजऽऽ अरे, सूरज ! खेळायला येतोस का ?"

छोटू घरात येत ओरडला. सूरज गोष्टीचे पुस्तक वाचत होता. गोष्टीत गुंग झाला होता. छोटूकडे त्याचे लक्ष गेले नाही. सूरजचे बाबा तेथेच बसले होते. ते छोटूला म्हणाले, " काय छोटूराव, आज सूरजला खेळायला बोलवायला आला आहेस ?"

छोटू म्हणाला, " खेळायला सोबत कुणीच नाही, आणि त्याला अेक गंमतपण दाखवायची आहे. "

" अस्सं होय !" सूरजचे बाबा म्हणाले. मग ते सूरजला म्हणाले, " या पोराला काय करावे ? सारखा घरात बसतो. पुस्तकातला किडा नुसता !" आणि त्यानी सूरजच्या पुढयातले पुस्तक खसकन ओढून घेतले.

सूरजने बाबाकडे पाहिले. त्याच्या डोळ्यात पाणी आले. त्याचे रडवे तोंड पाहून बाबा आणखीच चिडले. ओरडले, " रडूबाई कुठला ! जा, जा जरा बाहेर. थोडे तरी खेळ जा ! छोटू, ने रे याला ओढून !"

छोटू पुढे सरसावला. सूरज आत आईकडे धावला.म्हणाला, " आई, मला नाही आवडत खेळायला. बाबांना माझे पुस्तक सांग ना गं द्यायला. किती छान चाँदपरीची गोष्ट आहे !"

आईही मग रागाने म्हणाली, " अरे बाबा, जा जरा घराबाहेर. "

" मी नाही जा ! मला नीट खेळता येत नाही म्हणून सारे चिडवतात; सगळेजण आरडाओरडा करतात; भांडतात; मारामारी करतात. मला आपले घरात छान वाटते. " सूरज म्हणाला.

" घरांत काय छान असते रे ? " छोटूने मध्येच गमतीने विचारले.

" अरे, खूप गोष्टीची पुस्तके आहेत. त्यात छान छान चित्रे आहेत. मी कागदावर, पाटीवर, घरच्या फरशीवर रंगीत खडूने चित्रे काढतो; कविता म्हणतो. छान वाटते मला. " सूरजने आनंदाने सांगितले.

आई म्हणाली, " हा पोरगा एकलकोंडा झाला आहे ! याला कोणी मित्र नको, खेळ नको. कसे होणार याचे ?"

" ते तुमचे तुम्ही पहा. तुम्हीच लाडावून ठेवलाय त्याला " बाबा म्हणाले.

" मी काय लाड करतेय ?" आई चिडून म्हणाली.

सूरजने ओळखले,आता आपल्यावरुन आई-बाबा भांडणार! त्याचे तोंड आणखीच रडवे झाले.

ते पाहून बाबा चिडले. दरडावून म्हणात्ये, " छोटूबरोबर खेळायला जातोस की नाही ? की देऊ मार –

बाबांचा रुद्रावतार पाहून, तो छोटूबरोबर मुकाटयाने बाहेर गेला. दोघे अंगणात आले. दीपक, उमेश, रमेश, लालू, बाळू यांचा खेळ रंगात आला होता. त्यांना पाहून छोटू आनंदाने म्हणाला, " काय मित्रांनो, कुठे गेला होता ? किती शोधले तुम्हाला ? चला खेळू या ! "

सूरज एका दगडावर बसला. छोटू त्याला विसरुन मित्राशी बोलत होता. " चला, खेळू या "

" काय खेळू या " बाळूने विचारले.

दीपक म्हणाला, " लपाछपी,"

रमेश लगेच बोलला, " नको ! सारखी काय लपाछपी ?"

" बरे तर, आंधळी कोशिंबीर ?"

लालूने विचारले.

" अं ऽ ऽ हं ! " उमेशने नकार दिला.

" मग काय खेळायचे ? " लालूने विचारले.

छोटू गमतीने सर्वांकडे पहात होता. एकदम तो म्हणाला, " थांबा हं जरा, सांगतो काय खेळायचं ते आणि जवळ असणाऱ्या झाडावर तो सरसर चढला. बेचक्यात हात घातला. बॅट, बॉल काढला. उमेशपाशी दिली. खाली उतरला.

" अरे वा, नवीन दिसतेय !" रमेश म्हणाला,

" होयच मुळी ! परवाच बाबांनी आणली " छोटूने अभिमानाने सांगितले. सगळे बॅट- बॉलवर हात फिरवून निरखू लागले. छोटू म्हणाला, " मी बॅटिंग करतो. बोलिंग कोण करणार ? " सगळे ' मी करतो, मी करणार ! म्हणू लागले.

दगडावर एकटाच बसलेला सूरज त्यांच्याकडे नुसता पहात बसला होता.

सगळ्यांनी गोल केला, हातात हात गुंफून. लाल्या पहिला रमेश दुसरा, दीपक तिसरा, बाळू चौथा असे नंबर ठरले.

एकदम छोटूच्या लक्षात आले, सूरज दगडावर गप्पच बसला आहे. तो सूरजला म्हणाला, " तू नाही येत काय ? "

" तुम्ही खेळा मी पहातो, " सूरज म्हणाला. सारे हसले. म्हणाले, " हात् रे रडूबाई "

छोटू म्हणाला, " तू बोलिंग करतोस ? "

" अहं ! मी तुम्हाला चेंडू मागून देतो. "

छोटू बॅटिंग करू लागला. लाल्या बोलिंग. खेळ रंगू लागला. अचानक गडबड झाली. छोटूने छानदार फटका लगावला. चेंडू उसळला तो थेट सूरजच्या कपाळावर आदळला. सूरज धाड्कन् आपटला. मुले घाबरली. छोटू सूरजपाशी धावला.

आरडाओरडा ऐकून सूरजचे बाबा बाहेर आले. सूरज धुळीत पडलेला दिसला. " काय झाले ? अरे काय झाले ? "

म्हणून ते धावले. सूरज रडत होता. जागजागी खरचटले होते. कपाळावर भले मोठे टेंगूळ आले होते. हातालाही लागले होते.

आईने त्याला गरम पाण्याने पुसले. मलमपट्टी केली. हे सारे करताना बडबडत होती, " पोराचे कसे होणार, देव जाणे ! " मग तिने त्याचे कपडे बदलले.

सायंकाळ झाली. सूरजने खीर खाल्ली. त्याला झोप येऊ लागली. आईला म्हणाला, " आई गं ! "

" काय ? "

" माझे कपडे बदल ना ! "

" कशाला ? "

" किती घाण झालेत ! "

" दुपारीच बदलेत. "

" मलमाचे डाग पडलेत बघ कपड्याला ! "

" असू देत. "

" नको गं, दुसरे घाल ना ! "

" उद्या आंघोळ केल्यावर छान कपडे घाल –"

" नको, आत्ताच घाल ! "

" आत्ताच का पण ? "

सूरज लाजला. म्हणाला, " मग, चाँदपरी स्वप्नात येते ना रोज ! तिला काय वाटेल माझे मळके कपडे पाहून ? मला लाज वाटते. घाल ना दुसरे कपडे. "

आई मुकाटयाने उठली. सूरजला स्वच्छ, छान कपडे घातले.

दुसऱ्या दिवशी सूरजला ताप भरला. औषध, इंजक्शन झाले.

चार दिवस सूरज अंथरुणावर पडून होता. चौथ्या दिवशी

गंमत झाली. सूरजला त्रास होऊ नये म्हणून आईने दारे, खिडक्या लावून घरात अंधार केला होता. खिडकीला चीर होती. सकाळी त्यातून एक सूर्यकिरण गरगरत आत आला. तो दुसऱ्या भिंतीवर झेपावला. गरगर फिरू लागला.



सूरज किरणाकडे पाहू लागला. त्याच्या पलंगावरून

किरण दुसऱ्या भिंतीवर झेपावला होता. लांबलचक नळीसारखा तो वाटत होता. या गोल नळीत सूरजला गंमत दिसली, फिकट दुधाळी रंगात अनेक चांदण्यांचे कण चमचम करीत होते. त्या चांदण्या गोलगोल फिरत होत्या, तरंगत होत्या.

इतक्यात त्याच्या कानावर घंटेसारखा नाजूक आवाज आला. सूरज किलकिले डोळे करून पाहू लागला. पुन्हा सुंदर, नाजुक हसण्याचा आवाज झाला. झुमझुम पण कानी येत होती.

सुरज निरखून पाहू लागला. अरे या, चांदण्यांच्या कणा-बरोबर ही इवलीशी मुलीसारखी कोण दिसतंय ? किती छान गिरक्या मारतेय ! तिच्या हातातील छडी रूप्यासारखी चमकतेय्. पंख कसे लखलख करताहेत. फ्रॉक पण पांढरा शुभ्र आहे; चमचम करणाऱ्या टिकल्यांनी भरलाय. डोकीवरचा इवलासा मुकुट किती सुंदर आहे, सुरज मनात म्हणू लागला. तो हळूच म्हणाला. " अरे ही तर चाँदपरी दिसतेय ! " सुरजने आणखी निरखून पाहिले. चाँदपरीबरोबर आणखी बऱ्याच पऱ्या होत्या. पण त्यांचे डोकीवर मुकुट नव्हता. म्हणजे चाँदपरी पऱ्यांची राणी होती तर !

कितीतरी वेळ पऱ्या नाचत होत्या, गिरक्या मारत होत्या, तरंगत होत्या. त्यांच्या पायातले पैंजण छुमछुमाट करीत होते. त्यांचे गाणे मधुर होते. पण काय होते, ते कळत नव्हते. प-यांच्या भाषेतले गाणे त्या म्हणत होत्या.

नाचतानाचता चाँदपरी सूरज समोर आली. त्यांच्यापुढे तरंगू लागली. म्हणाली, " काय सूरज आवडले का नाचगाणे ?"

सूरजला नवल वाटले. तो म्हणाला, " माझे नाव तुला कसे माहित ?"

" आम्हाला असते माहित. आम्हाला जादू येते ना !"

" तुम्ही मला दिसलाय याचा किती आनंद झालाय मला! मला तुमचे नाचगाणे आवडले !"

" तुला बरे वाटावे म्हणून आम्ही आज आलो. तुझ्यासाठी गायलो आणि नाचलो !"

" खरेच ? "

" खरेच, ! परी कधी खोटे बोलते का ?"

" नाहीच मुळी !"

" आता तुला उद्या बरे वाटेल. शाळेत जायला लाग– "

" हो " सुरज म्हणाला.

" आणि जरा खेळायला जात जा. "

" मला नाही आवडत खेळबीळ "

" तसे नाही म्हणायचे सूरज ! तू खेळायला लागलास, तुला मित्र मिळाले की तुला खूप मजा वाटेल– "

" मला गोष्टीच्या पुस्तकात मजा वाटते. तुम्ही भेटता म्हणुन ! "

" अरे, आम्ही पऱ्या तुला गोष्टीतून गाण्यातून, स्वप्नातून भेटतोच की ! "

" पण, खेळातून कुठे भेटता ! "

" भेटतो ! "

" कशा ? "

" अरे खेळताना तुम्ही मुले खळखळून हसता, तुम्हाला आनंद झाला की तुमचा चेहरा, डोळे आनंदित होतात ना ? हे हसायला कोण लावतो ? आनंदी कोण करतो ? आम्हीच ! "

गाल फुगवून सूरज म्हणाला, " आणि खेळताना पडलो म्हणजे ? मारामारी केल्यावर रडू येते ते ? मग – "

चाँदपरी हसली. म्हणली, " आणि जरा रडले, तर काय झाले ? रडण्यातसुध्दा मजा असते ! "

" ती कशी ? "

" आता तू रडलास की तुझे आई–बाबा तुला खुश करण्यासाठी, हसवण्यासाठी नाना गमती-जमती करतात; खाऊ देतात. ते कोण त्यांना करायला लावते ? अरे, आम्हीच ! मग तुला छान वाटते ना. हसविलेलं. खुष केल की ?"

" हो ! "

" आम्ही तुझ्यासारख्या मुलांच्या आसपास सारखे असतो ; तुमची काळजी घेतो ; तुम्हाला आनंद देतो.

अधूनमधून रडवतो. पण तुम्हाला दिसत नाही "

" मला किती आनंद होईल रोज तुम्ही दिसला की! '

" मग त्यात काय गंमत राहिली. आणि असे सारखे दिसायची आम्हाला परवानगी नसते ? "

" का नसते ? "

" तुम्ही मुले मग कधीच मोठी होणार नाहीत म्हणून ! "

" म्हणजे काय गं ? "

" तू मोठा झालास की कळेल. आता ऐक, तु रोज थोडेतरी खेळ – "

" मग तू मला दिसशील ! "

चाँदपरीने विचार केला. म्हणाली, " बरे भेटेन, पण रोज नाही. तुलाच तेवढी दिसेन, अधूमधून. काय ? आता आमचा नाच पहा, गाणं ऐक – "

पऱ्या गिरक्या मारत छुमछुम नाचू लागल्या, गाऊ लागल्या, आणि सूरजला टाटा करीत कीरणांसह नाहीशा झाल्या.

सूरज खुद्कन हसत उठला, आईपाशी धावला, तिच्या खुशीत लाडे लाडे शिरत म्हणाला " आई गं , मला चाँदपरी भेटली, म्हणाली, तु रोज थोडेथोडे जरी खेळलास, तर मी तुला भेटेन म्हणून, आता मी रोज थोडेथोडे खेळणार – "

सूरजच्या आईने कौतुकाने त्याची पापी घेतली.

□ □

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
आ. क्र. १८८६ दि. १२.१.८६
विषय बा.वा.

BVBK-0401896
BVBK-0401896